| बाब | शासन निर्णय | दिनांक | विषय | वैशिष्ट्ये |
| --- | --- | --- | --- | --- |
| **चित्रपट** | क्र.आंचिम-२०११/प्र.क्र.१५८/सां.का.१, | १८.१०.२०१२. | आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजन करणाऱ्या संस्थांना सहायक अनुदानाबाबत. | प्रथम येणाऱ्यास प्रथम या तत्वावर विहीत निकषांची पुर्तता जास्तीत-जास्त १० संस्थांना अधिकत्तम रु.५ लाख एवढे सहायक अनुदान मंजूर करण्यात येते. |
| | क्र.मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१<br>क्र.मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१<br>क्र.मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१ | ३०.१०.२०१३<br>२८.०८.२०१४<br>०८.०८.२०१८ | दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरीता अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत. | दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरीता, परीक्षण समितीच्या परीक्षणाअंती गुणाच्या सरासरीनुसार व विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या चित्रपटांसाठी तसेच राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिक विजेत्या चित्रपटांना शासनाकडून अर्थसहाय्य "अ" दर्जा रु. ४० लाख, "ब" दर्जा रु.३० लाख.<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव व कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ येथे चित्रीकरण न झालेल्या चित्रपटांची रु.१ ००.लाख इतकी रक्कम कपात करण्यात येते. |
| | क्र.मचिअ-२००६/प्र.क्र.३०३/सां.का.३ | ०६.०२.२००७ | महाराष्ट्रातील ऐतिहासिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महात्वपूर्ण व्यक्तींच्या जीवनावर | महाराष्ट्रामधील थोर समाजसुधारक, ऐतिहासिक व्यक्ती, क्रांतीकारक व्यक्तींची जीवनावर आधारित मराठी चित्रपट निर्मीतीस प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सन १९९९ पासून अशा मराठी चित्रपटांना |

| बाब | शासन निर्णय | दिनांक | विषय | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| | | | आधारित मराठी चित्रपटांचा सहाय्यक अनुदान योजना. | सहाय्यक अनूदान मंजूर करण्याची योजना दि.६ फेब्रुवारी, २००७ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली असून उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार कमाल रु.५०.०० लाख अनुदानाची रक्कम ३ हप्त्यात देण्यात येईल. चित्रपट जास्तीत-जास्त २ वर्षांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. |
| **एक खिडकी योजना** | क्र.गोचिन २०१६/प्र.क्र.१८९/सां.का.१ | २२.०५.२०१८ | चित्रपट निर्मिती, टि.व्ही मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रिकरणाच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना ( Single Window Clearance System ) लागू करणेबाबत. | दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला - "चित्रपट, टि.व्ही मालिका, जाहिरात पट व माहितीपट इत्यादी करिता शासकीय जागेवरती चित्रिकरणासाठी निर्मात्यांना घ्याव्या लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या वेब पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (Fifteen Working Days) मिळाव्यात यासाठी "एक खिडकी योजना" राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.२२.०५.२०१८ अन्वये चित्रिकरणासाठी एक खिडकी योजनेला मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर योजना |

| बाब | शासन निर्णय | दिनांक | विषय | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| | क्र.गोचिन २०१६/प्र.क्र.१८९/सां.का.१ | ०४.०३.२०२२ | | सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर प्रथम टप्प्यात मुंबई शहर व मुंबई उपनगराकरीता लागू करण्यात आली.<br>योजनेच्या प्राथमिक टप्प्याच्या अंमलबजावणीत आलेले अनुभव विचारात घेऊन, संपूर्ण महाराष्ट्र राज्यामधील एक खिडकी योजनेमार्फत केंद्र / राज्य शासनाच्या अधिपत्याखालील शासकीय / निमशासकीय चित्रीकरण स्थळांवरील चित्रीकरणासाठी राज्य शासकीय / निमशासकीय विभागांच्या आवश्यक त्या ना-हरकत / परवानग्या देण्यास शासन निर्णय दि.०४.०५.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली. |